## विधि व न्याय विभाग

५ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ मार्च, २०२३.

### अधिसूचना

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३.**

क्रमांक संकीर्ण ०११८/१५८/प्र.क्र.३७/कार्यासन ११.—फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ( १९७४ चा २ ) हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ७ च्या पोट-कलम ( ३ ) तसेच कलम ९ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, मुंबई येथे अधिकारिता असणाऱ्या उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करुन, याद्वारे निदेश देत आहेत की, दिनांक ७ एप्रिल, २०२३ पासून, या सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ठाणे जिल्ह्यातील ठाणे तालुक्यातील गावांसाठी सत्र उपविभागाची निर्मिती करीत आहे आणि उक्त सत्र उपविभागाच्या सीमांतर्गत उद्भवणाऱ्या प्रकरणांची न्यायचौकशी करण्यासाठी बेलापूर, नवी मुंबई येथे सत्र न्यायालयाची स्थापना करीत आहे, ज्याचे पीठासीन अधिकारी अतिरिक्त सत्र न्यायाधीश असतील. सत्र न्यायाधीश, ठाणे हे, बेलापूर, नवी मुंबई येथील सत्र उपविभागाचे देखील सत्र न्यायाधीश असतील, आणि त्यास, उक्त सत्र उपविभागाकडील प्रकरणे स्वतः निकाली काढण्याचे किंवा सक्षम अधिकारिता असलेल्या इतर कोणत्याही न्यायालयाकडे सोपविण्याचे, अथवा त्यास योग्य वाटतील अशी कोणतीही प्रकरणे, बेलापूर, नवी मुंबई येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीशाकडे सोपविण्याचे अधिकार असतील.

### अनुसूची

( ठाणे जिल्ह्यातील ठाणे तालुक्यातील बेलापूर, नवी मुंबई येथील सत्र उपविभाग या न्यायालयाच्या अधिकारितेत समाविष्ट असलेल्या महसूली गावांची सूची )

| | | | |
|---|---|---|---|
| १ | बेलापूर | १६ | पावणे |
| २ | दारावे | १७ | बोरीवली |
| ३ | करावे | १८ | बोनसार |
| ४ | नेरुळ | १९ | कुकशेत |
| ५ | सारसोळे | २० | घणसोली |
| ६ | सोनखार | २१ | तळवली |
| ७ | शिरवणे | २२ | सावली |
| ८ | तुर्भे | २३ | दिवे |
| ९ | सानपाडा | २४ | गोठीवली |
| १० | वाशी | २५ | टेटवली |
| ११ | जुईगाव | २६ | ऐरोली |
| १२ | खैरणे | २७ | रबाळे |
| १३ | कोपरखैरणे | २८ | दिघे |
| १४ | महापे | २९ | इलठन |
| १५ | अडवली-भूतवली | ३० | चिंचवली |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नि. वि. जिवने,**
शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव.